**फौजदारी जामीन अर्ज क्र. ६३/२०२६**
**नागेश लोकडूजी कांगणे**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
(CNR NO. MHBU20-000135-2026)

## नि.क्र. १ खाली आदेश
## (पारीत दिनांक २० मार्च २०२६)

**०१]** प्रस्तुतचा अर्ज; अर्जदार–**नागेश लोकडूजी कांगणे** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८२ अन्वये अटकपूर्व जामीन मिळण्याकामी दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी / पीडित हिने दिनांक ०४.०३.२०२६ फिर्याद दिली की, काही दिवसापूर्वी मौजे चिखला काकड गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटविण्यासाठी त्यांच्याच गावातील काही लोकांनी प्रयत्न केला होता. तेंव्हा फिर्यादीने त्यांचा प्रतिकार करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला कोणताही धक्का लागु दिला नव्हता. त्या घटनेच्या संबधाने तिने पोलीस ठाणे, बिबी येथे आरोपींविरूध्द रितसर तक्रार दिली होती. सदरहू घटनेची विवध प्रसारमाध्यमातुन तसेच सोशल मिडीयाव्दारे संपूर्ण महाराष्ट्राभर चर्चा झाली होती.

**०३]** दिंनाक ०४.०३.२०२६ रोजी सकाळी ०८.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादी मेहकर येथे आलेली असतांना तिचे नातेवाईक सतीश मोरे, रा. भुमराळा हे तिला मेहकर येथे भेटले व त्यांनी सांगीतले की, संतोष डी. कायंदे नावाच्या व्यक्तीने त्याचे फेसबुक अकाऊट वरून कॉमेंट केली आहे. त्यांनी फिर्यादीला त्या अश्लिल व फिर्यादीची बदनामी करणाऱ्या कमेटंचा स्क्रिनशॉट दाखवला. फिर्यादीने स्क्रिनशॉट पाहिला असता, त्यामध्ये नागेश कांगणे नावाच्या फेसबुक अकाउंट वरून फिर्यादीबद्दल लिहले होते की, "जिने दोन नवरे सोडले, ती म्हणते की मी अनेकाची जिरवली आहे, बरोबर आहे अनेकाच्या पाण्याची चव हिने चाखली आहे, परीसरातील सर्व लोकांना माहीती आहे, जिने पुर्वीच्या दोन नवऱ्यांविरूध्द पोलीसांत

तक्रार करून प्रकरणे दाखल केली आहेत, जी माहेरी राहुन तीने गाव नासवले आहे, वातावरण खराब केले आहे, परीसरात विचारून बघा ही बया कशी आहे, किती जणांसोबत ती रोज शेज सजवते, थोडा तरी विचार करा बांधवांनो". त्या कमेटचा स्क्रिनशॉट वाचल्यानंतर फिर्यादीला खूप लज्ञास्पद वाटले व त्यामुळे तिची समाजात मोठ्या प्रमाणात बदनामी होऊन तिचे चारीत्र्य हणन झाले. नागेश कांगणे नावाने फेसबुक वर अकांउट असलेल्या व्यक्तीची फिर्यादी व तिचे नातेवाईकांनी चौकशी केली असता, त्याचे पूर्ण नाव आणि पत्ता नागेश लोकडुजी कांगणे, रा. रामनगर, मेहकर, ता. मेहकर जि. बुलढाणा असे असल्याचे समजले. त्याच्या फेसबुक अकांउटची प्रोफाईल लिंक https://www.facebook.com.profile.php?id=100029213599264 अशी दिसुन आली. आरोपी नागेश लोकडुजी कांगणे याने केलेल्या फेसबुक पोस्टवर संतोष कायंदे याने कॉमेंट केली आणि फिर्यादीची समाजामध्ये बदनामी केली. तसेच फिर्यादीचे चारीत्र्य हणन करून तिला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले. सदरहू पोस्ट ही मोठ्या प्रमाणामध्ये सोशल मिडीयावर तसेच ईतर समाज माध्यमांवर प्रसारीत झाली आहे. अशा आशयाची फिर्याद पोलीस ठाणे, मेहकर येथे दाखल करण्यात आली.

०४] अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. वाकोडे यांनी युक्तिवाद केला की, अर्जदारावर सोशल मिडीयावर कॉमेंट केल्याबाबत आरोप आहे. सदरहू कॉमेंटमध्ये कोणत्याही व्यक्तीचे नाव नमूद नाही. ती कॉमेंट अर्जदाराने केली असा कोणताही सबळ पुरावा पटलावर आलेला नाही. अर्जदाराचा त्या कॉमेंटशी कोणताही संबंध नाही. केवळ राजकीय वैमनस्यामुळे अर्जदारावर खोटी केस करण्यात आली आहे. अर्जदार हा त्याचे घरातील कर्ता पुरूष आहे. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. अर्जदाराला अटकपूर्व जामीन दिल्यास तो कोणत्याही अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. त्यामुळे अर्जदाराला अटकपूर्व जामीन देण्याची विनंती करण्यात आली.

०५] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. एस. एम. खत्री यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद

केला की, अर्जदाराने या गुन्ह्यात सक्रीय सहभाग घेतलेला आहे. तपास अपूर्ण असून अर्जदाराला अटकपूर्व जामीन मिळाल्यास तो साक्षीदारांना फितूर करेल. अर्जदाराचा मोबाईल जप्त करणे आहे व या गुन्ह्यात इतर कोण सहभागी आहे याचा सखोल तपास करणे बाकी आहे. त्यामुळे वरील सर्व कारणास्तव अर्जदाराचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०६] दोन्ही पक्षाच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने, केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, अर्जदारावर फिर्यादीच्या अनुषंगाने सोशल मिडीयावर कॉमेंट केल्याचा आरोप आहे. सदरहू कॉमेंट मध्ये कोणत्याही व्यक्तीच्या नावाचा उल्लेख नाही. त्यामुळे ही बाब बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करते. अर्जदाराविरूद्ध नोंद असलेल्या गुन्ह्यात मृत्यूदंड अथवा आजन्म कारावासाच्या शिक्षेची तरतूद नाही. अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. अर्जदाराला जामीन दिल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भीती व साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादून केले जाऊ शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य परिस्थिती, गुन्ह्याचे स्वरूप, आरोपीचे कृत्य व तपासाची स्थिती पाहता, अर्जदाराचा जामीन अर्ज सशर्त मंजूर होण्यास पात्र आहे.

करिता पुढील आदेश पारि करण्यात येतो.

**— आ दे श —**

०१] अटकपूर्व जामीन अर्ज क्र. ६३/२०२६ मंजूर करण्यात येतो.

०२] अर्जदार **– नागेश लोकडूजी कांगणे** याला अटक होतेवेळेस पोलीस ठाणे, मेहकर येथील अपराध क्र. १५७/२०२६, कलम ७५, ३५६(३) भारतीय न्याय संहिता आणि कलम ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा, खालील गुन्ह्यात त्याचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर अटकपूर्व जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदाराने तपासात सहकार्य करावे आणि दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत दर सोमवारी तपासी अंमलदारापुढे दुपारी ०२.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान हजर राहावे.

**०४]** अर्जदाराने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०५]** अर्जदाराने दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत मौजे चिखला काकड, ता. लोणार या गावात प्रवेश करू नये.

**०६]** अर्जदाराने पीडीत व तिच्या कुटुंबियांसोबत कोणत्याही प्रकारे संपर्क साधु नये.

**०७]** अर्जदाराने यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०८]** अर्जदाराने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्याची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.20 14:48:33 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**विशेष न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – २०.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
विशेष न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – २०.०३.२०२६